Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १३४ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

पाणी व माती संवर्धनासाठी परभणीकर रस्त्यावर

(पान २ वर)



Selected

### बांगलादेशच्या राष्ट्राध्यक्षपदी BNP नेते मिर्झा फखरुल इस्लाम

ढाका : बांगलादेशच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत बांगलादेश नॅशनल पार्टीचे (BNP) नेते मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर विजयी झाले असून त्यांची देशाच्या २३व्या राष्ट्राध्यक्षपदी निवड झाली आहे. गेल्या ३५ वर्षांतील ही पहिलीच स्पर्धात्मक राष्ट्राध्यक्ष निवडणूक ठरली आहे. राष्ट्रीय संसदेत झालेल्या मतदानात मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर यांना २५५ मते मिळाली. त्यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी लिबरल डेमोक्रॅटिक पार्टीचे अध्यक्ष आणि जमात-ए-इस्लाम समर्थित आघाडीचे उमेदवार कर्नल (निवृत्त) ओळी अहमद यांचा पराभव केला. ओळी अहमद यांना ८८ मते मिळाली. त्यामुळे आलमगीर यांच्या विजयाकडे बांगलादेशच्या राजकीय इतिहासातील महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून पाहिले जात आहे.

## राहुल गांधी यांचा पोलिस ठाण्यात ६ तास ठिय्या;राहुल गांधींचा सरकारवर थेट हल्ला

# पॅलेट गन प्रकरणी एफआयआर दाखल!

## अखेर पोलीस प्रशासन झुकले; भारतीय न्याय संहितेशी संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । नीट पेपर लीकविरोधात आणि सीजेपीच्या नेतृत्वात २० जुलै रोजी जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान पेलेट (छर्रे) लागून गंभीर जखमी झालेल्या १९ वर्षीय तरुणाच्या तक्रारीवरून दिल्ली पोलिसांनी अखेर गुन्हा दाखल केला आहे.**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी (२१ ऑगस्ट २०२६) पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याबाहेर तब्बल ६ तासांहून अधिक वेळ ठिय्या आंदोलन केल्यानंतर पोलीस प्रशासनाला नमते घ्यावे लागले. एफआयआर नोंदवल्यानंतर राहुल गांधी यांनी आपले आंदोलन मागे घेतले असून, हे न्यायाच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले.

जुलै महिन्यात झालेल्या आंदोलनात १९ वर्षीय साहिल लोछाब हा तरुण पेलेट लागल्याने गंभीर जखमी झाला होता. साहिलच्या शरीरात २०० हून अधिक छर्रे रुतले असून, त्याच्या एका डोळ्याची दृष्टी जाण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी साहिल गेल्या महिनाभरापासून



पोलीस ठाण्यांचे फेरे मारत होता.

शुक्रवारी राहुल गांधी स्वतः पीडित साहिल आणि त्याच्या आईला सोबत घेऊन प्रथम मंदिर मार्ग पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवण्यासाठी गेले होते. तेथे मागणी मान्य न झाल्याने त्यांनी पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाणे गाठले आणि पोलीस उपआयुक्त (मध्य) सचिन शर्मा यांची भेट घेतली. मात्र, चर्चेतून कोणताही मार्ग न निघाल्याने राहुल गांधी यांनी साहिलसह पोलीस ठाण्याच्या आवारातच ठिय्या मांडला.यावेळी खासदार प्रियंका गांधी, के. सी. वेणुगोपाल, जयराम रमेश, कुमारी शैलजा, रणदीप सुरजेवाला, सलमान खुर्शी ,यांच्यासह काँग्रेसचे बडे नेते सहभागी झाले होते. एफआयआर दाखल झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, "साहिलच्या शरीरात छर्रे रुतलेले आहेत आणि त्याच्या डोळ्याची दृष्टी धोक्यात आली आहे. महिनाभर संघर्ष केल्यानंतर आंदोलनामुळे आज कुठे एफआयआर नोंदवला गेला, यावरून देशातील सामान्य जनतेला न्यायासाठी किती त्रास सहन करावा लागतो हे स्पष्ट होते."राहुल गांधी यांनी पुढे आरोप केला की, "गृहसचिव आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या मंजुरीनंतरच हा एफआयआर नोंदवला गेला आहे. स्थानिक पोलिसांना गुन्हा दाखल करायचा होता, पण त्यांच्यावर वरून दबाव होता." तसेच, आंदोलनादरम्यान पेलेट गनच्या वापरावर गृहमंत्री अमित शाह यांनी अद्याप कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही माफी मागितलेली नाही, असा घणाघात त्यांनी केला. दरम्यान, काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनीही दिल्ली पोलिसांवर केंद्र सरकारच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच 'नीट' आंदोलन हिंसाचार प्रकरणाच्या तपासासाठी पाच सदस्यांची समिती स्थापन केली आहे.

### सुमारे ६ तासांच्या तीव्र आंदोलन

सुमारे ६ तासांच्या तीव्र आंदोलनानंतर पोलिसांनी तक्रार स्वीकारत 'भारतीय न्याय संहिता २०२३' च्या कलम ११८ (१) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. हे कलम घातक शस्त्रांचा वापर करून स्वेच्छेने गंभीर दुखापत पोहोचवण्याशी संबंधित आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यातील तपास अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आला आहे.एफआयआर नोंदवल्यानंतर राहुल गांधी यांनी आपले आंदोलन मागे घेतले असून, हे न्यायाच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले.

## राम माधव यांनी श्रीलंकेत ISIच्या निवृत्त अधिकाऱ्यांची भेट घेतल्याचा प्रकाश आंबेडकरांचा दावा

### आरएसएस आणि केंद्र सरकारला जाब विचारण्याचे आवाहन; विरोधी पक्षांच्या भूमिकेवरही आंबेडकरांचा निशाणा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | (प्रतिनिधी):** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या एका गंभीर दाव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) माजी प्रवक्ते राम माधव यांनी मागील काही महिन्यांत श्रीलंकेत पाकिस्तानच्या गुप्तचर संस्था ISIच्या काही निवृत्त अधिकाऱ्यांची भेट घेतल्याचा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. या भेटीत चार महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याची माहिती आपल्याकडे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे हा दावा केला आहे. "हे चार मुद्दे काय होते? याचा खुलासा RSS प्रमुख मोहन भागवत यांनी केला पाहिजे," अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच राम माधव किंवा RSSला अशा प्रकारच्या चर्चेसाठी केंद्र सरकारकडून अधिकृत परवानगी देण्यात आली होती का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. विरोधी पक्षांवरही निशाणा या प्रकरणावरून आंबेडकर यांनी देशातील विरोधी पक्षांच्या भूमिकेवरही टीका केली आहे. भारतीय सुरक्षेशी संबंधित प्रश्न असतानाही विरोधी पक्षनेते राम माधव यांच्या कथित भेटीबाबत प्रश्न उपस्थित करताना दिसत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. "या देशातील विरोधी पक्षांचे दुर्दैव आहे की, विरोधी पक्षनेते



भारतीय सुरक्षा आणि राम माधव यांच्या भेटीबद्दलचे प्रश्न उपस्थित करताना दिसत नाहीयेत," अशी भूमिका त्यांनी मांडली. सरकारला जाब विचारण्याचे आवाहन राम माधव यांनी ISIच्या निवृत्त अधिकाऱ्यांशी नेमकी कोणत्या विषयांवर चर्चा केली, याचा खुलासा झाला पाहिजे, अशी मागणी आंबेडकर यांनी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी RSS किंवा राम माधव यांना ISIचे पदाधिकारी अथवा परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचा अधिकार दिला होता का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. नागरिकांनी या विषयावर सार्वजनिक पातळीवर चर्चा करून सरकारला जाब विचारावा, असे आवाहनही आंबेडकर यांनी केले आहे.दरम्यान, राम माधव यांनी श्रीलंकेत ISIच्या निवृत्त अधिकाऱ्यांची भेट घेतल्याचा आणि त्या भेटीत चार मुद्द्यांवर चर्चा झाल्याचा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला असला, तरी त्यांच्या या दाव्याची स्वतंत्र अधिकृत पुष्टी अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या आरोपावर संबंधितांकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## तुकाराम मुंढेंच्या FDAची मुंबईत मोठी कारवाई!

### अस्वच्छता आणि अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** मुंबईतील कुलाबा परिसरात अन्न आणि औषध प्रशासनाने (FDA) मोठी कारवाई करत प्रसिद्ध खाद्य आस्थापनांना दणका दिला आहे. मॅकडोनाल्ड्सच्या किऑस्कसह बॉम्बे प्रेसिडन्सी रेडिओ क्लब लिमिटेड, स्टेटस रेस्टॉरंटसह एकूण १३ खाद्य आस्थापनांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन आढळल्यानंतर संबंधित आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

रेडिओ क्लबमध्ये झुरळे, माशांचा वावर १९ ऑगस्ट रोजी FDAच्या पथकाने कुलाब्यातील बॉम्बे प्रेसिडन्सी रेडिओ क्लब लिमिटेडची अचानक तपासणी केली. परिसरात माशांचा मोठ्या प्रमाणात वावर तसेच एक मृत झुरळ आढळले. भांडी धुण्याच्या ठिकाणीही झुरळांपासून बचावासाठी वापरले जाणारे ट्रॅप आढळून आले. अन्न तयार करण्याच्या जागेतील छताचे प्लास्टर उखडलेले असल्याने ते अन्नपदार्थात पडण्याचा धोका असल्याचे तपासणीत निदर्शनास आले. खाद्यपदार्थांच्या जवळच वॉशिंग पावडर व रासायनिक पदार्थ ठेवण्यात आले होते. भांडी आणि खाद्यपदार्थ थेट जमिनीवर ठेवलेले आढळले. नॉनव्हेज खाद्यपदार्थ ठेवण्यासाठी वापरण्यात येणारा रेफ्रिजरेटर अस्वच्छ होता. तसेच तापमान नियंत्रण व त्याची नोंद ठेवण्याबाबतही त्रुटी आढळल्या. कर्मचाऱ्यांचे हेल्मेट आणि कपडे खाद्यपदार्थ ठेवण्याच्या जागेजवळ आढळून आले. स्वयंपाकघराचा दरवाजा व्यवस्थित बंद नसणे, स्टोव्हजवळ कचरापेटी ठेवणे आणि परिसरात थुंकीचे डाग आढळणे, अशा अनेक त्रुटी तपासणीत समोर आल्या. ४७ टक्के नियमांचे उल्लंघन FDAच्या तपासणीत संबंधित आस्थापनाकडून सुमारे ४७ टक्के अन्नसुरक्षा नियमांचे पालन झाले नसल्याचे आढळल्याचे सांगण्यात आले. हात न धुता अन्नपदार्थ हाताळणे, योग्य प्रकारे कॅलिब्रेशन न केलेले रेफ्रिजरेशन युनिट वापरणे आणि तापमानाची नोंद उपलब्ध नसणे, अशा मूलभूत बाबींमध्येही त्रुटी आढळल्या. या पार्श्वभूमीवर अन्नसुरक्षेचा धोका लक्षात घेऊन संबंधित परवाना निलंबित करण्यात आला असून, निलंबनाच्या कालावधीत खाद्यपदार्थांची खरेदी, विक्री आणि वितरण करण्यास बंदी घालण्यात आली आहे.


### लोकशाही जपली तर पक्ष फुटणार नाही...!

पंढरपूर | प्रतिनिधी महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनी अंतर्गत लोकशाहीचा प्रभावीपणे वापर करून आपल्या लोकप्रतिनिधींच्या भावना समजून घेतल्या, तर पक्ष फुटण्याची परिस्थिती निर्माण होणार नाही, असे महत्त्वपूर्ण विधान विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पंढरपुरात केले. सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हासंदर्भातील खटल्याची मॅरेथॉन सुनावणी सुरू असतानाच नार्वेकरांच्या या वक्तव्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.राहुल नार्वेकर यांनी पंढरपुरातील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे 'जेन-झी' पिढीतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## रस्ता खचला, खडीने भरलेला डंपर 10 ते 12 फूट खाली अडकला

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी:** नाशिकमध्ये रस्त्यांची गुणवत्ता आणि रस्त्यांवरील खड्डे हे मुद्दे पुन्हा चर्चेला कारण ठरले आहेत. त्यामागे कारण देखील तसंच आहे. एक खडीने भरलेला डंपर खडी उतरवत असताना धक्कादायक प्रकार घडला. डंपर ज्या ठिकाणी उभा होता तिथला रस्ता थेट 10 ते 12 फुट खोल खाली खचला. यामुळे हा डंपर या दहा ते बारा फुटांच्या खड्ड्यात अडकला. संबंधित घटना ही गंगापूर रोडवर नवश्या गणपती परिसरात घडली. रस्ते कामासाठी खडी उतरवत असताना संबंधित घटना घडली आहे. रस्त्याच्या कामाचा दर्जा आणि सुरक्षेवर प्रश्न उपस्थित या घटनेमुळे रस्त्यांच्या कामाचा दर्जा आणि सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच या घटनेत सुदैवाने मोठी जीवितहानी टळली आहे. मात्र या घटनेमुळे शहरातील रस्त्यांचे कामे आणि खड्डे यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्याकडून 80 टक्के खड्डे बुजवल्याचा आणि कामाची गुणवत्ता चांगला असल्याचा दावा केला जात असतानाच दुसरीकडे ही मोठी दुर्घटना समोर आली आहे. 43 वर्षीय बॉयफ्रेण्डने नाशिकच्या 34 वर्षीय विवाहितेला संपवलं, सात वर्षांची लेक पोरकी, लग्नबाह्य संबंधांचा दुर्दैवी शेवट



नाशिकमधील 34 वर्षीय विवाहितेच्या मृत्यू प्रकरणाला वळण, दोन वर्षांचे प्रेमसंबंध, रिसॉर्टवर 43 वर्षीय प्रियकराने जीव घेतला तुमच्या नवऱ्याला बरं करतो! तृतीयपंथी असल्याचं भासवून घरात घुसला, मुंबईत एअर होस्टेसवर अत्याचार, 28 वर्षीय तरुणाला चार तासात अटक आधी मित्राची कार दामटवली, मग थेट पोलिसांचं वाहन पळवून कोस्टल रोडवर धुमाकूळ, अनेक वाहनांना धडक, माथेफिरु ताब्यात कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये विकासकामे सुरु नाशिकमध्ये पुढच्यावर्षी सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरु आहेत. या विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर शहरभरात काम सुरु आहे. रस्ते, पाणी पुरवठा, मलनिस्सारण, वीज तसेच पायाभूत सुविधांचे काम एकाचवेळी सुरु आहे. त्यामुळे नाशिककरांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. खड्ड्यांमुळे विविध घटनांमध्ये 5 जणांचा मृत्यू शहरभरात विविध ठिकाणी रस्ते खोदून ठेवण्यात आले होते आणि त्यांचे काम सुरु होते. यामुळे परिणामी वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण व्हायची. आता काही ठिकाणी रस्त्यांचे काम होत आल्याचा दावा केला जात आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## 'आयफोन 15 प्रो घेऊन देतो, खाली ये'; विनवण्या करूनही कुणाल ऐकला नाही!

### दुर्घटनेत तिघांचा मृत्यू; मोबाईलच्या ईएमआयवरून वादानंतर तरुणाची टोकाची

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी:** छत्रपती संभाजीनगरमधील तिसगाव परिसरातील टेकडीवर घडलेल्या हृदयद्रावक दुर्घटनेत आई-वडिलांसह १८ वर्षीय तरुणाचा दरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाला. मोबाईलच्या ईएमआयच्या पैशांवरून झालेल्या वादानंतर तरुणाने टोकाचे पाऊल उचलण्याची धमकी दिल्याची प्राथमिक माहिती आहे. तब्बल तीन तास त्याची समजूत काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. 'तुला आयफोन १५ प्रो घेऊन देतो, खाली ये,' अशी विनवणीही करण्यात आली; मात्र तरुण कुणाल चंदगुडे याने कोणाचेही ऐकले नाही.



मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल चंदगुडे याने काही दिवसांपूर्वी आयफोन खरेदी केला होता. या मोबाईलचा ईएमआय भरण्यासाठी तो कुटुंबीयांकडे पैशांची मागणी करत होता. यावरून त्याचा वडील मुरलीधर चंदगुडे यांच्याशी वाद झाल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर संतप्त झालेला कुणाल सकाळी सुमारे १० वाजता वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तिसगाव येथील टेकडीवर जाऊन बसला आणि टोकाचे पाऊल उचलण्याची धमकी देऊ लागला. कुणाल कड्याच्या टोकावर असल्याची माहिती मिळताच त्याचे आई-वडील, पोलीस, अग्निशमन दलाचे जवान तसेच स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले. तिसगावचे माजी सरपंच संजय जाधव यांच्यासह उपस्थित नागरिकांनी सुमारे तीन तास कुणालची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्याला विविध प्रकारे समजावून सांगण्यात आले. त्याची मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन देत 'आयफोन १५ प्रो घेऊन देतो, खाली ये', अशी विनंतीही करण्यात आली. मात्र, त्याने कोणाचेही ऐकले नाही.

दरम्यान, दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास मुलाला सुरक्षितपणे खाली आणण्यासाठी वडील मुरलीधर चंदगुडे स्वतः त्याच्याजवळ गेले. त्यांनी कुणालचा हात पकडून त्याला कड्यापासून मागे ओढण्याचा प्रयत्न केला. मात्र, या झटापटीत दोघांचाही तोल गेल्याने बाप-लेक खोल दरीत कोसळले. ही घटना डोळ्यांसमोर घडल्याने आई संगीता चंदुगडे यांना मोठा मानसिक धक्का बसला. त्यानंतर त्यांनीही दरीत उडी घेतल्याचे सांगण्यात येते. या दुर्घटनेत कुणाल, त्याचे वडील मुरलीधर आणि आई संगीता या तिघांचाही मृत्यू झाला. घटनेमुळे तिसगाव परिसरात एकच खळबळ उडाली असून, चंदुगडे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. उपस्थित नागरिकांच्या मोबाईलमध्ये या घटनेचे चित्रीकरण झाल्याची माहितीही समोर आली आहे. मोबाईलच्या हप्त्याच्या वादातून सुरू झालेला हा प्रकार अखेर एका कुटुंबासाठी काळीज पिळवटून टाकणाऱ्या दुर्घटनेत बदलला.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत

अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ
संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# पाणी व माती संवर्धनासाठी परभणीकर रस्त्यावर

## 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा'चा संदेश

जन सम्राट टाईम्स

**परभणी | प्रतिनिधी:** माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आणि जलसंधारण दिनाच्या पार्श्वभूमीवर परभणी येथे 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेश देत 'महा-वॉकेथॉन – वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले. जलसंधारणाबाबत जनजागृती करण्याच्या या उपक्रमाला परभणीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यभरात २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन, १५ ते २१ ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताह, तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिक, विशेषतः युवकांमध्ये मृद व जलसंधारणाचे महत्त्व रुजविण्याच्या उद्देशाने महा-वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयापासून कृषी विद्यापीठापर्यंत वॉकेथॉन जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील क्रीडा संकुलापर्यंत महा-वॉकेथॉन काढण्यात आली. जिल्हा परिषद अध्यक्षा लता वाकळे यांच्या हस्ते वॉकेथॉनचा शुभारंभ झाला. यावेळी महापौर सय्यद इकबाल, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय घोन्सीकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी कविराज कुचे, तहसीलदार डॉ. संदीप राजापुरे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. घोषणांनी दुमदुमला परिसर वॉकेथॉनमध्ये सहभागी नागरिकांनी हातात जलसंधारणाचे संदेश देणारे




फलक घेत विविध घोषणा दिल्या. 'पाणी वाचवा, पाणी अडवा, पाणी जिरवा', 'माती वाचवा, पाणी वाचवा', 'पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल, जपुया त्याचे मोल', 'पाणी नाही तर विकास नाही', 'जलसंधारणाशिवाय पर्याय नाही', 'जल है तो कल है' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची गरज माती आणि पाणी ही अत्यंत महत्त्वाची नैसर्गिक संसाधने असून त्यांच्या संवर्धनासाठी व्यापक लोकसहभाग आवश्यक आहे. केवळ भाषणातून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून जलसंधारणाचा संदेश जनमानसात रुजविणे गरजेचे आहे. पाण्याची उपलब्धता वाढविणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आणि भविष्यातील पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप देणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी नागरिकांनी जलसंधारण अभियानात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. पाणी अडविणे, जमिनीत जिरविणे आणि मातीची धूप रोखणे यासाठी प्रत्येकाने आपल्या परिसरातील जलस्रोत व पाणलोट क्षेत्राच्या संवर्धनात योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले. 'प्रत्येक थेंबाचे संवर्धन करा' वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनीही नागरिकांना जलसंधारण अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करून जलसमृद्ध आणि हिरवागार महाराष्ट्र घडविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. चित्ररथातूनही जनजागृती महा-वॉकेथॉनदरम्यान चित्ररथाच्या माध्यमातून जलसंधारणाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने 'रील्स बनवा, बक्षीस मिळवा' या उपक्रमाची माहिती देण्यात आली. सोशल मीडियाच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही करण्यात आले. या उपक्रमातून जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक बांधिलकी आहे, असा प्रभावी संदेश परभणीकरांनी दिला.

# पहाणचे माजी सरपंच देविदास पाटील यांची बिनविरोध निवड!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** पहाण गावातील माजी सरपंच आप्पासो देविदास हरिदास पाटील यांची विविध कार्यकारी विकास सोसायटीच्या जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीसाठी बिनविरोध निवड झाल्याबद्दल राष्ट्रीय भीमसेनेचे जिल्हाध्यक्ष वाल्मिक जाधव यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. गावाच्या विकासासाठी सदैव तत्पर राहणारे, सहकार क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव असलेले तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे देविदास पाटील यांच्या नावाचा ठराव सर्वानुमते मंजूर झाल्याने त्यांच्या कार्यावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. देविदास पाटील यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा सहकार क्षेत्राला निश्चितच लाभ होईल. त्यांच्या माध्यमातून शेतकरी आणि ग्रामस्थांच्या हितासाठी प्रभावी कार्य घडावे तसेच सहकार क्षेत्राला नवी दिशा मिळावी, अशा शुभेच्छा वाल्मिक जाधव यांनी व्यक्त केल्या.




त्यांच्या बिनविरोध निवडीबद्दल गावातील नागरिक, सहकार क्षेत्रातील पदाधिकारी तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांकडूनही अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पहाण गावातील माजी सरपंच आप्पासो देविदास हरिदास पाटील यांची विविध कार्यकारी विकास सोसायटीच्या जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीसाठी बिनविरोध निवड झाल्याबद्दल राष्ट्रीय भीमसेनेचे जिल्हाध्यक्ष वाल्मिक जाधव यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# योगेश परदेशी यांची बांद्रा उपविभागात डेप्युटी इंजिनिअरपदी

## प्रदीर्घ शासकीय सेवेला मिळाले यश

जन सम्राट टाईम्स



**भडगाव | प्रतिनिधी :** भडगाव तालुक्यातील वाडे येथील रहिवासी श्री. योगेश नामदेव परदेशी यांची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील बांद्रा उपविभाग, मुंबई येथे उपअभियंता (डेप्युटी इंजिनिअर) पदावर पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार किशोर पाटील यांच्यासह परिसरातील विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. योगेश परदेशी यांची १० सप्टेंबर २०२३ रोजी कनिष्ठ अभियंता म्हणून शासकीय सेवेत निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी शाखा अभियंता म्हणूनही जबाबदारी सांभाळली. यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २००६ मध्ये त्यांची सहाय्यक अभियंता श्रेणी-२ म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सिंचन विभागात निवड झाली होती. आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात योगेश परदेशी यांनी मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर येथील बहुमजली इमारत बांधकाम विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA), ठाणे सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, ठाणे तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भिवंडी आदी विविध ठिकाणी जबाबदारी पार पाडली आहे. सुमारे २३ वर्षांच्या प्रदीर्घ शासकीय सेवेत प्रामाणिकपणा, परिश्रम आणि कार्यक्षमतेच्या जोरावर त्यांनी आपल्या कामाची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या याच कार्याची दखल घेत आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बांद्रा उपविभागात उपअभियंता पदावर पदोन्नती मिळाली आहे. योगेश परदेशी यांच्या पदोन्नतीबद्दल परदेशी राजपूत समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश कोंडू परदेशी यांच्यासह समाजबांधवांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशामुळे वाडे गावासह भडगाव तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या कार्याचा आदर्श युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. भडगाव तालुक्यातील वाडे येथील रहिवासी श्री. योगेश नामदेव परदेशी यांची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील बांद्रा उपविभाग, मुंबई येथे उपअभियंता (डेप्युटी इंजिनिअर) पदावर पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार किशोर पाटील यांच्यासह परिसरातील विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. योगेश परदेशी यांची १० सप्टेंबर २०२३ रोजी कनिष्ठ अभियंता म्हणून शासकीय सेवेत निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी शाखा अभियंता म्हणूनही जबाबदारी सांभाळली. आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात योगेश परदेशी यांनी मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर येथील बहुमजली इमारत बांधकाम विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMR-DA), ठाणे सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत सार्वजनिक बांधकाम बांधकाम उपविभाग, भिवंडी आदी विविध ठिकाणी जबाबदारी पार पाडली आहे.

# रोटवद येथे विद्यार्थ्यांना एचआयव्ही/एड्सबाबत जनजागृती; हक्कांचीही दिली

## ज्ञान प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयात मार्गदर्शन




जन सम्राट टाईम्स

**रोटवद । प्रतिनिधी:** राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'इंटेंसिफाइड कॅम्पेन 3.0' अंतर्गत रोटवद येथील ज्ञान प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयात एचआयव्ही/एड्स आणि लैंगिक आरोग्याबाबत जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम आयसीटीसी (ICTC), ग्रामीण रुग्णालय धरणगाव यांच्या वतीने घेण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना एचआयव्ही/एड्सची शास्त्रीय माहिती, संसर्गाचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय तसेच शासनाकडून उपलब्ध असलेल्या मोफत उपचार व आरोग्य सुविधांची सविस्तर माहिती देण्यात आली. एचआयव्ही/एड्सबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करण्याबरोबरच योग्य आरोग्यविषयक माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर यावेळी भर देण्यात आला. कायदेशीर हक्कांबाबतही मार्गदर्शन एचआयव्ही आणि एड्स (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायद्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. एचआयव्ही बाधित व्यक्तींना मिळणारे कायदेशीर संरक्षण, समान वागणुकीचा अधिकार आणि गोपनीयतेचा अधिकार याबाबतही जागरूक करण्यात आले. किशोरवयीन मुला-मुलींना आरोग्यविषयक समुपदेशन कार्यक्रमात किशोरवयीन मुला-मुलींमध्ये वयानुसार होणारे शारीरिक व मानसिक बदल, वैयक्तिक स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि योग्य समुपदेशनाचे महत्त्व याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न उपस्थित करून तज्ज्ञांकडून माहिती जाणून घेतली. कार्यक्रमाला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना महांत, उपमुख्याध्यापक श्री. सोनवणे सर, श्री. पाटील यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही/एड्सबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी तसेच किशोरवयीन आरोग्याविषयी योग्य माहिती उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

# इच्छापूर्ती हनुमान मंदिराचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा

## आकर्षक विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळला

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा। (प्रतिनिधी):** पाचोरा शहरातील बळीराम पाटील नगर येथील इच्छापूर्ती हनुमान मंदिराचा प्रथम वर्धापन दिन भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण मंदिर परिसराची आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिराची फुलांनी केलेली सजावट भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. वर्धापन दिनाच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी दिनेश बापू आमले यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाआरतीसाठी परिसरातील बजरंग भक्त, नागरिक आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादासाठी भाविकांचा मोठा जनसागर लोटला. यावेळी शिवसेना गटनेते सुमित किशोर आप्पा पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील, जिल्हा परिषदेचे माजी



उपाध्यक्ष ज्ञानेश्वर आमले, प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक किशोर भाऊ पाटील यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव, पदाधिकारी आणि असंख्य बजरंग भक्त उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त इच्छापूर्ती हनुमान मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी दिवसभर मोठी गर्दी केली होती. भक्तिमय वातावरण, जय हनुमानच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. मंदिर मित्रपरिवाराचे परिश्रम कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इच्छापूर्ती हनुमान मंदिर मित्रपरिवाराचे विठ्ठल महाजन, कमोद मिस्तरी, कैलास पाटील, भरत पाटील, जितू आबा सावळे, सुधाकर बापू चौधरी, रवींद्र सोनवणे, विकी पहिलवान, करतार चांगले, संदीप राजपूत, हर्षल धनगर, विकी सूर्यवंशी, गोपाल पाटील, सचिन वखरे, आकाश चौधरी, राहुल सावळे यांच्यासह मित्रपरिवारातील कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. वर्धापन दिनानिमित्त झालेल्या धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने आयोजकांनी समाधान व्यक्त केले. पाचोरा शहरातील बळीराम पाटील नगर येथील इच्छापूर्ती हनुमान मंदिराचा प्रथम वर्धापन दिन भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण मंदिर परिसराची आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिराची फुलांनी केलेली सजावट भाविकांचे लक्ष वेधून घेत होती.

# गिरीष चे नेत्रदीपक यश; NEET मध्ये प्रवर्गात महाराष्ट्रात प्रथम

जन सम्राट टाईम्स

**भडगाव। प्रतिनिधी:** वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या NEET परीक्षेत ७२० पैकी ६६२ गुण मिळवत VJNT प्रवर्गात महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून चाळीसगाव येथील चि. गिरीष गोठवाळ याने नेत्रदीपक यश संपादन केले आहे. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल परदेशी राजपूत समाज संघटना, जळगाव यांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. गिरीष गोठवाळ याने आपल्या मेहनतीच्या जोरावर मिळविलेले हे यश



चाळीसगावसह संपूर्ण समाजासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगून सातत्याने केलेल्या अभ्यासाचे फळ त्याला मिळाले आहे. या यशाबद्दल परदेशी राजपूत समाज संघटना जळगावचे जिल्हाध्यक्ष सुरेश परदेशी यांच्या हस्ते गिरीषचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा सचिव विनोदसिंग परदेशी, तंटामुक्ती समिती जिल्हाध्यक्ष विनोद परदेशी, ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. जगनसिंग परदेशी तसेच गिरीषच्या कुटुंबातील सदस्य आणि समाजबांधव उपस्थित होते. गिरीषच्या यशाचे कौतुक करताना उपस्थितांनी त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्याच्या यशामुळे समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण आणि स्पर्धात्मक परीक्षांमध्ये सातत्यपूर्ण मेहनत करण्याची नवी प्रेरणा मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# ७/१२ वरील कालबाह्य नोंदी कमी करण्यासाठी ८५ हजारांची लाच!

## तलाठ्याने पैसे मागितल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी:** शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर अधिकारातील कालबाह्य नोंदी कमी करण्याच्या मोबदल्यात ८५ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी पाचोरा येथील खाजगी स्टॅम्प वेंडर समाधान सुभाष पाटील (रा. कुऱ्हाड खुर्द, ता. पाचोरा) याच्याविरुद्ध पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे यांच्या कारवाईनंतर ही कारवाई करण्यात आली. तक्रारदाराच्या आजोबा ममराज हजारी पंजारी यांच्या नावावर कुऱ्हाड खुर्द येथे असलेल्या शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील कालबाह्य नोंदी कमी करण्यासाठी तक्रारदाराने तलाठी नकुल काळकर यांची भेट घेतल्याचे समोर आले आहे. त्यावेळी तलाठ्याने ८० हजार रुपयांची मागणी करून पुढील कामासाठी स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांना भेटून पैसे देण्यास सांगितल्याचा आरोप आहे.

पंचासमक्ष पडताळणीत ९० हजारांची मागणी या प्रकरणी तक्रारदाराने ७ जुलै रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानंतर पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणीत समाधान पाटील याने सुरुवातीला ९० हजार रुपये मागितल्याचे निष्पन्न झाले.



तडजोडीनंतर ८५ हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केल्याची माहिती एसीबीकडून देण्यात आली. दरम्यान, तक्रारदाराच्या काकांनी आरोपी व तलाठ्याविरुद्ध तक्रार केल्याची माहिती आरोपीला मिळाल्यानंतर त्याने तक्रारदाराच्या घरी जाऊन पैसे देण्याची गरज नसल्याचे सांगितले.

त्यामुळे नियोजित सापळा कारवाई होऊ शकली नसल्याचे समोर आले. स्टॅम्प वेंडरला अटक; तहसील परिसरात खळबळ या प्रकरणी २० ऑगस्ट रोजी पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर समाधान पाटील याला सायंकाळी अटक करण्यात आली. पोलिसांच्या या कारवाईमुळे पाचोरा तहसील कार्यालय परिसरात खळबळ उडाली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक पद्मावती कलाल यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. उपअधीक्षक सचिन सान्दखे यांच्या पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक यशवंत बोरसे पुढील तपास करीत आहेत.

# महात्मा फुले हायस्कूलमध्ये तालुकास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धा उत्साहात संपन्न

## इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय प्रथम; साळवे इंग्रजी विद्यालय द्वितीय

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी :** शहरातील सुवर्ण महोत्सवी शाळा महात्मा फुले हायस्कूल, धरणगाव आणि शिक्षण विभाग, पंचायत समिती धरणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय विज्ञान मेळावा २०२६-२७ अंतर्गत विज्ञान नाट्य स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी डॉ. भावना भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेचे प्रास्ताविक महात्मा फुले हायस्कूलचे मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती धरणगावचे शिक्षण विस्तार अधिकारी आर. जी. सैंदाणे होते. यावेळी पाळधी बीटचे केंद्रप्रमुख प्रदीप जाधव आणि विज्ञान मंडळाचे तालुका समन्वयक नवनीत सपकाळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सत्यशोधक महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तालुकास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय, साळवे हायस्कूल, नांदेड हायस्कूल,



महात्मा फुले हायस्कूल, बोरगाव हायस्कूल, बा. च. भाटिया हायस्कूल साकरे आणि पिंपरी मुलींची शाळा अशा सात शाळांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विज्ञानविषयक विविध संकल्पना, प्रयोगशीलता आणि सामाजिक संदेश प्रभावीपणे नाट्याच्या माध्यमातून सादर केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेचे परीक्षण चित्रकला शिक्षक सुनील तायडे, समाधान कोळी आणि श्याम सपकाळे यांनी केले. विजेत्या संघांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी विज्ञान तालुका समन्वयक नवनीत सपकाळे, विज्ञान शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात आर. जी. सैंदाणे यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विज्ञान नाटिकांचे कौतुक करून सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील उपशिक्षक एस. एन. कोळी व एस. व्ही. आढावे यांनी केले, तर खान सर यांनी आभार मानले. शहरातील सुवर्ण महोत्सवी शाळा महात्मा फुले हायस्कूल, धरणगाव आणि शिक्षण विभाग, पंचायत समिती धरणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय विज्ञान मेळावा २०२६-२७ अंतर्गत विज्ञान नाट्य स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी डॉ. भावना भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेचे प्रास्ताविक महात्मा फुले हायस्कूलचे मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती धरणगावचे शिक्षण विस्तार अधिकारी आर. जी. सैंदाणे होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# 'गुणांसोबत संस्कारांचीही शिदोरी जपा; माणुसकीची मार्कशीट सर्वात मोठी' – पालकमंत्री गुलाबराव पाटील

## गुणवंत विद्यार्थिनींच्या पाठीवर कौतुकाची थाप; नंदिनी-धनश्रीचा ॲक्टीव्हा देऊन गौरव

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव/जळगाव । प्रतिनिधी:** विद्यार्थ्यांनी आयुष्यात केवळ गुणांच्या शर्यतीत अडकून न राहता स्वतःतील वेगळे कौशल्य ओळखून त्याला योग्य दिशा द्यावी. चांगली मार्कशीट महत्त्वाची आहे; मात्र माणुसकीची मार्कशीट त्याहून मोठी आहे. आयुष्यात कितीही मोठे व्हा, पण आई-वडील, शिक्षक आणि समाजाबद्दलचा आदर कधीही कमी होऊ देऊ नका, असे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. धरणगाव येथील बालकवी ठोंबरे व सारजाई कुडे माध्यमिक विद्यालयात आयोजित 'विद्यार्थी गुणगौरव सोहळ्या'त ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष हेमलाल भाटिया होते. सलग दोन वर्षे तालुक्यात प्रथम क्रमांकाची परंपरा पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, दहावीच्या परीक्षेत मागील वर्षी धरणगाव तालुक्यात नंदिनी राकेश पवार, तर यंदा धनश्री अनिल पाटील हिने प्रथम क्रमांक पटकावला. सलग दोन वर्षे एकाच शाळेतील विद्यार्थिनी तालुक्यात प्रथम येणे ही केवळ दोन विद्यार्थिनींची वैयक्तिक कामगिरी नसून, शाळेत निर्माण झालेल्या भक्कम शैक्षणिक संस्कृतीची पावती आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांची मेहनत आणि पालकांचा विश्वास या तिन्ही घटकांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. नंदिनी व धनश्री यांच्यासह त्यांच्या आई-वडिलांचे, शिक्षकांचे आणि श्री विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या संपूर्ण परिवाराचे त्यांनी अभिनंदन केले.

नंदिनी-धनश्रीचा ॲक्टीव्हा देऊन गौरव मेहनतीचे कौतुक विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा



देते. त्यामुळे नंदिनी आणि धनश्री यांचा ॲक्टीव्हा देऊन गौरव करण्यात आला. या सत्कारातून इतर विद्यार्थ्यांमध्येही 'पुढील वर्षी या व्यासपीठावर माझाही सत्कार झाला पाहिजे', अशी जिद्द निर्माण व्हावी, हा गौरवामागील उद्देश असल्याचे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. यावेळी शालेय परिसरात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. 'मोबाईलचा वापर ज्ञानासाठी करा, गुलाम बनू नका' आज मोबाईल, इंटरनेट आणि डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांसमोर ज्ञानाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मात्र, सुविधा वाढल्या म्हणून यश आपोआप मिळत नाही.

मोबाईलचा वापर अभ्यास, ज्ञानवृद्धी आणि प्रगतीसाठी करा; मोबाईलचा गुलाम बनू नका, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगळी क्षमता असते. केवळ पहिला क्रमांक मिळवणे म्हणजेच यश नव्हे. स्वतःतील कौशल्य ओळखून त्याला योग्य दिशा द्यावी आणि मेहनतीच्या जोरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी, असा संदेशही त्यांनी दिला. पालकमंत्र्यांच्या योगदानाबद्दल संस्थेकडून कृतज्ञता कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष हेमलाल भाटिया यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या कार्याचा गौरव केला. बालकवी ठोंबरे शाळेच्या विकासासाठी पालकमंत्र्यांचे नेहमीच भरीव योगदान व सहकार्य लाभले आहे. शाळेच्या विविध विकासकामांना त्यांनी सातत्याने पाठबळ दिल्यामुळे शाळेच्या प्रगतीला मोठी चालना मिळाली असून, त्यांचे योगदान संस्थेसाठी मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला संस्थेचे सचिव लालाजी उपासनी, उपाध्यक्ष चिंतामण पाटील, संचालक प्रा. हेमंत पाटील, मुख्याध्यापक जीवन पाटील, एस. एस. पाटील, ललितजी उपासनी, शांताराम महाजन, शोभाताई चौधरी, सुशिलभाई गुजराथी, ॲड. राजेंद्र येवले, प्रदीप मालपुरे, यशवंत कुलकर्णी, मनोहर बडगुजर, ॲड. राहुल पारखे, मोहन रावतोळे, ज्ञानेश्वरजी भामरे, प्रदीप बऱ्हाटे यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपाध्यक्ष चिंतामण पाटील यांनी केले.

# ॲड. अंकुश कटारे यांचा २२ ते २४ ऑगस्टदरम्यान जिल्हा दौरा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष ॲड. अंकुश कटारे हे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर व जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ॲड. अविनाश भालेराव यांच्या सूचनेनुसार दि. २२ ते २४ ऑगस्टदरम्यान जिल्हा दौरा करणार आहेत.

या दौऱ्यात पश्चिम जळगाव जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय कार्यकर्त्यांशी संवाद साधून अनुसूचित जाती विभागाचे संघटन अधिक मजबूत करण्याबाबत चर्चा केली जाणार आहे.

या दौऱ्यात महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राहुल मोरे तसेच माजी प्रदेश सचिव अनिरुद्ध सावळे हे ॲड. अंकुश कटारे यांच्यासोबत उपस्थित राहणार आहेत. दौऱ्यादरम्यान जिल्हा कार्यकारिणी, तालुकाध्यक्ष तसेच शहराध्यक्ष यांच्या निवडीबाबत कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात येणार आहे. तसेच अनुसूचित जाती विभागाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी आगामी काळातील कार्यक्रम व उपक्रमांबाबतही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार आहे.या दौऱ्यात काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संघटनात्मक चर्चेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष ॲड. अंकुश कटारे यांनी केले आहे. यासंदर्भातील प्रसिद्धीपत्रक जिल्हा काँग्रेस सरचिटणीस बाबा देशमुख व प्रदीप सोनवणे यांनी प्रसिद्ध केले आहे.


### दौऱ्याचे वेळापत्रक

चाळीसगाव – सकाळी १० वाजता
भडगाव – दुपारी २ वाजता
एरंडोल – सायंकाळी ५ वाजता
दि. २३ ऑगस्ट :
अमळनेर – सकाळी १० वाजता
धरणगाव – दुपारी २ वाजता
पारोळा – सायंकाळी ५ वाजता
दि. २४ ऑगस्ट :
पाचोरा – सकाळी १० वाजता
जळगाव ग्रामीण – सायंकाळी ५ वाजता

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# पाचोरा गिरणा पंपिंग रोडवर रस्ता खोदून चार दिवस उलटले

## खोदलेला मुख्य रस्ता अद्याप जैसे थे



जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** शहरातील गिरणा पंपिंग रोडवरील मुख्य रस्ता पाईपलाईन टाकण्यासाठी ठेकेदाराकडून गेल्या चार दिवसांपासून खोदून ठेवण्यात आला आहे. मात्र, अद्याप खोदकाम पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आलेला नसल्याने नागरिकांसह शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

मुख्य रस्त्यावरच मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आल्याने वाहनचालकांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांनाही या मार्गावरून जाताना त्रास सहन करावा लागत असून, खोदलेल्या रस्त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या ठिकाणी अपघाताची शक्यता अधिक असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. 'प्रशासन सुस्त, ठेकेदार मस्त' रस्ता खोदून चार दिवस उलटूनही काम पूर्ण न झाल्याने नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. 'प्रशासन सुस्त, ठेकेदार मस्त' अशी संतप्त भावना नागरिक व्यक्त करीत असून, संबंधित ठेकेदाराने कामाला गती देऊन रस्ता तातडीने पूर्ववत करावा, अशी मागणी होत आहे. या प्रश्नाकडे लक्ष वेधताना शिवसेना उपजिल्हाप्रमुख पी. एम. पाटील यांनी प्रशासनाने नागरिकांची गैरसोय गांभीर्याने घ्यावी, अशी मागणी केली आहे. खोदकाम केलेल्या रस्त्यावर योग्य त्या सुरक्षाव्यवस्था कराव्यात तसेच पाईपलाईनचे काम तातडीने पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित ठेकेदाराला सूचना द्याव्यात आणि खोदकाम केलेला रस्ता सुरक्षित करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी नागरिकांसह शिवसेना उपजिल्हाप्रमुख पी. एम. पाटील यांनी केली आहे. ठेकेदाराकडून गेल्या चार दिवसांपासून खोदून ठेवण्यात आला आहे.

मात्र, अद्याप खोदकाम पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आलेला नसल्याने नागरिकांसह शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

# धुळे NHM कंत्राटी पदभरतीवरील स्थगिती उठवण्यासाठी युवासेना आक्रमक

## सुशिक्षित बेरोजगारांच्या भवितव्याचा प्रश्न

जन सम्राट टाईम्स



**धुळे। प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने रुग्णसेवेवर मोठा परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत सुरू असलेल्या कंत्राटी पदभरती प्रक्रियेला स्थगिती देण्यात आल्याने शेकडो सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही स्थगिती तातडीने उठवून भरती प्रक्रिया पूर्ववत करण्यासाठी युवासेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. युवकांच्या हक्कासाठी आणि प्रलंबित भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली. ३० जूनचा स्थगिती आदेश रद्द करण्याची मागणी युवासेनेने ३० जून २०२६ रोजीचा स्थगिती आदेश तातडीने रद्द करावा, अशी प्रमुख मागणी केली. तसेच धुळे जिल्ह्यातील डॉक्टर, परिचारिका आणि इतर तांत्रिक पदांची प्रलंबित भरती प्रक्रिया त्वरित पूर्ण करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेत मनुष्यबळाची कमतरता असल्याने रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे रिक्त पदे भरून आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी प्रशिक्षित व पात्र युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे युवासेनेने नमूद केले. मंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद हे निवेदन युवासेना जिल्हाप्रमुख योगेश मराठे यांनी आरोग्यमंत्र्यांकडे सुपूर्द केले. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख मनोज कोळेकर उपस्थित होते. युवकांच्या या प्रश्नावर मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे युवासेनेकडून सांगण्यात आले. युवकांना न्याय मिळेपर्यंत युवासेना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार असल्याची भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली. आरोग्य केंद्रे, कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने रुग्णसेवेवर मोठा परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत सुरू असलेल्या कंत्राटी पदभरती प्रक्रियेला स्थगिती देण्यात आल्याने शेकडो सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# नाहाटा महाविद्यालयात अँटी रॅगिंग कायद्याबाबत मार्गदर्शन

## 'ॲड. प्रिया अडकमोल यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ । (प्रतिनिधी):** येथील नाहाटा महाविद्यालयात युवती कल्याण समिती, महिला तक्रार निवारण व अंतर्गत तक्रार समिती, SHe Box तसेच भुसावळ तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने अँटी रॅगिंग व कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगविरोधी जनजागृती निर्माण करण्यासोबतच कायदेशीर अधिकारांची माहिती देणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बी. एच. बऱ्हाटे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. डॉ. जी. आर. वाणी, प्रमुख वक्त्या ॲड. प्रिया अडकमोल, पत्रकार उज्वला बागुल (PLV), सौ. रूपाली नेवे, सौ. नेहा जावरे, युवती कल्याण समिती प्रमुख प्रो. डॉ. गौरी पाटील, महिला तक्रार निवारण व विशाखा समिती प्रमुख प्रा. डॉ. विद्या पाटील तसेच SHe Box-अंतर्गत तक्रार समिती प्रमुख प्रा. डॉ. स्वाती फालक उपस्थित होत्या. रोपट्याला पाणी देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो. डॉ. गौरी पाटील यांनी केले. यावेळी पत्रकार उज्वला बागुल यांनी विधी सेवा समितीच्या कार्याची प्राथमिक माहिती देत जिल्हा व गावपातळीवर विविध कायदेविषयक शिबिरे आणि उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. 'रॅगिंग सहन करणे हेदेखील गुन्हा' प्रमुख वक्त्या ॲड. प्रिया अडकमोल यांनी अँटी रॅगिंग कायद्याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. "रॅगिंग सहन करणे हेदेखील एक गुन्हा आहे. रॅगिंग ही सीनियर होण्याची परंपरा नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या तसेच पीडित आणि रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांवर होणारे सामाजिक व मानसिक परिणाम त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. कोणत्याही प्रकारची रॅगिंगची घटना घडल्यास विद्यार्थ्यांनी गप्प न राहता संबंधित यंत्रणेकडे तक्रार करण्याचे आवाहनही त्यांनी केले. 'अभ्यासावर लक्ष केंद्रित करा' अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करून इतरांना त्रास होईल, अशी कोणतीही कृती किंवा वर्तणूक करू नये, असे आवाहन केले.

# किरकोळ वादातून दगडफेक; पोलिसांचा बंदोबस्त वाळू टाकण्याच्या कारणावरून दोन गट आमनेसामने;

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी:** जळगाव शहरातील सुप्रीम कॉलनी परिसरात किराणा दुकानासमोर वाळू टाकण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद होऊन दगडफेक झाल्याची घटना गुरुवारी रात्री सव्वादहा वाजेच्या सुमारास घडली. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुप्रीम कॉलनीतील एका किराणा दुकानासमोर वाळू टाकण्यात आल्यावरून दुकान मालकाच्या मुलाचा एका व्यक्तीसोबत वाद झाला. त्यानंतर काही तरुण एकत्र येऊन समोरील गल्लीत दगडफेक केल्याचे सांगण्यात येत आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून दुसऱ्या गटातील काही व्यक्तींनीही दगडफेक केल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलिसांची घटनास्थळी धाव घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांचे पथक तसेच एसडीपीओंचे आरसीपी पथक घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी तातडीने जमाव पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास दरम्यान, पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच अन्य उपलब्ध माहितीची पडताळणी सुरू आहे. दगडफेकीत नेमके कोण सहभागी होते, याचा तपास करण्यात येत असून, चौकशीनंतर संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. परिस्थिती नियंत्रणात; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन सध्या सुप्रीम कॉलनी परिसरातील परिस्थिती नियंत्रणात असून, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये किंवा अफवा पसरवू नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# भाजप अनुसूचित जमाती मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणीवर प्रल्हाद सोनवणे

## भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष प्रल्हाद सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अनुसूचित जमाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. देवराव होळी व प्रभारी आमदार योगेश सागर यांनी प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली. आदिवासी समाजातील नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, युवक व महिलांना संघटनेशी जोडणे तसेच भाजपची विचारधारा आदिवासी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रल्हाद सोनवणे यांनी केलेल्या कार्याची पक्षाने दखल घेत त्यांना प्रदेश कार्यकारिणीत संधी दिल्याचे सांगण्यात आले. या नियुक्तीमुळे जळगाव जिल्ह्याला भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणीत प्रतिनिधित्व मिळाले असून, जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आदिवासी समाजातील नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, युवक व महिलांना संघटनेशी जोडणे तसेच भाजपची विचारधारा आदिवासी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रल्हाद सोनवणे यांनी केलेल्या



कार्याची पक्षाने दखल घेत त्यांना प्रदेश कार्यकारिणीत संधी दिल्याचे सांगण्यात आले. प्रल्हाद सोनवणे यांच्या नियुक्तीबद्दल जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, आदिवासी मोर्चा प्रदेश संयोजक ॲड. किशोर काळकर, माजी आमदार रमेशदादा पाटील, केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार अमोल जावळे, आमदार नंदकिशोर महाजन, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, पूर्व जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर, पश्चिम जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी यांच्यासह भाजपा पदाधिकारी व आदिवासी समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले. प्रदेश कार्यकारिणीतील नव्या जबाबदारीच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडण्यासोबतच शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रल्हाद सोनवणे यांनी सांगितले.

# आगामी काळात 200 बेडच्या कॅन्सर रुग्णालयाचे उद्घाटन करु'

## १०० बेडच्या महिला व बाल रुग्णालयासह शवविच्छेदन गृहाचे लोकार्पण

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत १०० बेडच्या महिला व बाल रुग्णालयासह शवविच्छेदन गृहाचे लोकार्पण शुक्रवारी (दि. २१ ऑगस्ट) करण्यात आले. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते हा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जनतेला दर्जेदार आणि प्रभावी आरोग्यसेवा देण्यासाठी प्रामाणिकपणे काम



### बाल रुग्णांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा

धुळे जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून १०० बेडचे महिला व बाल रुग्णालय उभारण्यात आले होते. आरोग्यमंत्री आणि पालकमंत्र्यांच्या वेळेअभावी त्याचे औपचारिक लोकार्पण रखडले होते. मात्र, लोकार्पण प्रलंबित असतानाही रुग्णांच्या हितासाठी हे रुग्णालय सेवेत सुरू करण्यात आले होते. त्याचा अनेक रुग्णांनी लाभ घेतला आहे. अखेर शुक्रवारी मंत्र्यांच्या हस्ते या अत्याधुनिक व सर्व सुविधायुक्त रुग्णालयाचे औपचारिक लोकार्पण करण्यात आले. यामुळे महिला व बाल रुग्णांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.

करण्याचे आवाहन केले. "चांगले काम करा; आगामी काळात धुळ्यात २०० बेडच्या कॅन्सर रुग्णालयाचे उद्घाटन करू," असे आश्वासन त्यांनी दिले. धुळे जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून १०० बेडचे महिला व बाल रुग्णालय उभारण्यात आले होते. आरोग्यमंत्री आणि पालकमंत्र्यांच्या वेळेअभावी त्याचे औपचारिक लोकार्पण रखडले होते. मात्र, लोकार्पण प्रलंबित असतानाही रुग्णांच्या हितासाठी हे रुग्णालय सेवेत सुरू करण्यात आले होते. त्याचा अनेक रुग्णांनी लाभ घेतला आहे. अखेर शुक्रवारी मंत्र्यांच्या हस्ते या अत्याधुनिक व सर्व सुविधायुक्त रुग्णालयाचे औपचारिक लोकार्पण करण्यात आले. यामुळे महिला व बाल रुग्णांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. यावेळी उपस्थित मंत्री व लोकप्रतिनिधींनी धुळे जिल्ह्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे सांगितले. ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार उपचार मिळावेत, यासाठी आवश्यक सुविधा वाढविण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.या कार्यक्रमास आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, महापौर मायादेवी परदेशी, जिल्हा रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. रवींद्र सोनवणे, हिरे रुग्णालयाचे डॉ. अजित पाठक, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनोज मोरे, डॉ. तुळशीराम गावित यांच्यासह विविध पदाधिकारी, अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

# असोदा येथे उत्साहात पार पडला दशामाता विसर्जन सोहळा!

## खान्देशी ठेक्यावर धरला ताल, 'मोटू-पतलू'ची जोरदार धम्माल!

जन सम्राट टाईम्स



असोदा | प्रतिनिधी असोदा (जि. जळगाव) येथे दशामाता विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. महेश काशिनाथ गुरव यांच्या निवासस्थानी यंदाही मोठ्या भक्तिभावाने दशामातेचे आगमन झाले होते. यानिमित्ताने विधिवत पूजा-अर्चा आणि महाआरती करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने दशामातेची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. विसर्जन मिरवणुकीदरम्यान भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांच्या तालावर तरुणाईने खान्देशी ठेका धरत जल्लोष केला. ढोल-ताशांचा निनाद, भक्तिगीते आणि जयघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले ते लहान मुलांचे लाडके कार्टून पात्र 'मोटू-पतलू'. 'मोटू-पतलू'च्या अनोख्या आणि धमाल एंट्रीमुळे चिमुकल्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली. मुलांनी या कार्टून पात्रांसोबत आनंद लुटला, तर उपस्थित नागरिकांनीही या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दशामाता विसर्जन सोहळ्यात भक्ती आणि परंपरेसोबतच मनोरंजनाची जोड मिळाल्याने मिरवणुकीत आणखी रंगत आली. यानिमित्ताने विधिवत पूजा-अर्चा आणि महाआरती करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने दशामातेची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. तरुणाईचा उत्साह आणि चिमुकल्यांचा आनंद यामुळे संपूर्ण वातावरण जल्लोषमय झाले होते. विधिवत पूजा-अर्चा, महाआरती आणि त्यानंतर काढण्यात आलेल्या मिरवणुकीतून धार्मिक परंपरेचे जतन करत उत्सव साजरा करण्यात आला. भक्तिमय वातावरणात दशामातेचा जयघोष करत अखेर विसर्जन सोहळा संपन्न झाला. भक्ती, खान्देशी संस्कृती आणि मनोरंजनाचा सुंदर संगम घडविणाऱ्या या सोहळ्यामुळे असोदा गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.पारंपरिक वाद्यांच्या तालावर तरुणाईने खान्देशी ठेका धरत जल्लोष केला. ढोल-ताशांचा निनाद, भक्तिगीते आणि जयघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले ते लहान मुलांचे लाडके कार्टून पात्र 'मोटू-पतलू'. 'मोटू-पतलू'च्या अनोख्या आणि धमाल एंट्रीमुळे चिमुकल्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली. मुलांनी या कार्टून पात्रांसोबत आनंद लुटला, तर उपस्थित नागरिकांनीही या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दशामाता विसर्जन सोहळ्यात भक्ती आणि परंपरेसोबतच मनोरंजनाची जोड मिळाल्याने मिरवणुकीत आणखी रंगत आली.

## तर मराठा समाजाच्या नोकऱ्यांना चॅलेंज करणार': सदावर्ते

बीड | प्रतिनिधी : विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करावी, तसेच खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलावरही गुन्हा दाखल करून अटक करावी, या मागणीसाठी बीडमध्ये मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते सहभागी झाले होते. मोर्चानंतर आयोजित पत्रकार परिषदेत सदावर्ते यांनी विविध मुद्द्यांवर आक्रमक भूमिका मांडत सरकारला इशारा दिला. २१ जून रोजी विलास घुले यांची हत्या झाली होती. या प्रकरणात आतापर्यंत दहा आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलाचा या प्रकरणात सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला असून, त्याच्यावरही गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी आंदोलकांनी केली. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातून मोर्चाला सुरुवात झाली. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला. निवेदन स्वीकारण्यासाठी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी उपस्थित होते. यावेळी गुणरत्न सदावर्ते आणि उपजिल्हाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यानंतर उपजिल्हाधिकाऱ्यांनी माफी मागितल्यानंतर सदावर्ते यांनी त्यांच्याकडे निवेदन सुपूर्द केले. मोर्चानंतर सदावर्ते यांच्या हस्ते विलास घुले यांच्या कुटुंबीयांचे उपोषण सोडण्यात आले.

# वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर जळगाव पोलिसांचा दणका!

## हेल्मेट, मद्यप्राशन, मोबाईल वापर, ट्रिपल सीटसह विविध नियमभंगांवर कारवाई

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी** : आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी जळगाव पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोठी कारवाई करण्यात आली. जिल्हा पोलीस दल आणि महामार्ग सुरक्षा पथकाने (HSP) संयुक्तपणे केलेल्या कारवाईत तब्बल ७ हजार १०५ केसेस दाखल करण्यात आल्या असून, वाहनचालकांकडून एकूण ५२ लाख ४५ हजार ४५० रुपयांचा दंड आकारण्यात आला. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली.

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांचे अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. सकाळपासून सुरू असलेली ही कारवाई सायंकाळनंतरही सुरू ठेवण्यात आली असून, रात्री ११ वाजेपर्यंत नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. जिल्हा पोलीस दलाकडून ५,६७० केसेस जिल्हा पोलीस दलामार्फत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५ हजार ६७० वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत ३९ लाख ७० हजार ९५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तर महामार्ग सुरक्षा पथकाने (HSP) स्वतंत्रपणे १ हजार ४३५ केसेस दाखल करून १२ लाख ७५ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल केला. दोन्ही यंत्रणांच्या कारवाईची आकडेवारी एकत्रित केल्यास ७,१०५ प्रकरणांमध्ये ५२.४५ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

कोणत्या नियमभंगांवर कारवाई? या विशेष मोहिमेत विना हेल्मेट वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, बेकायदेशीर पार्किंग, मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अल्पवयीनांकडून वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, ट्रिपल सीट, वाहन चालविताना मोबाईलचा वापर, विना दिवे किंवा रिफ्लेक्टर वाहन चालविणे, रॉंग साईड ड्रायव्हिंग अशा विविध प्रकारच्या नियमभंगांवर कारवाई करण्यात आली.

याशिवाय विना परवाना शालेय वाहतूक, शाळा व महाविद्यालय परिसरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन तसेच मोटार वाहन कायद्यातील इतर तरतुदींचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवरही दंडात्मक कारवाई करण्यात आली. सणासुदीत नियम पाळण्याचे आवाहन सणासुदीच्या काळात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा होत असल्याने रस्त्यांवरील वाहतूक वाढते. त्यामुळे वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत. हेल्मेटचा वापर करावा, मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, तसेच स्वतःसह इतरांच्या जीवितास धोका निर्माण होईल असे कृत्य टाळावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी केले आहे. ही मोहीम अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत (जळगाव) आणि अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते (चाळीसगाव) यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा तसेच महामार्ग सुरक्षा पथकातील अधिकारी व अंमलदारांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

# ईद-ए-मिलादुन्नबीला महाराष्ट्रात 'ड्राय डे' घोषित करा!

जन सम्राट टाईम्स



**मलकापूर | (प्रतिनिधी):** पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या ईद-ए-मिलादुन्नबीच्या दिवशी २६ ऑगस्ट २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात 'ड्राय डे' घोषित करावा, अशी जोरदार मागणी AIMIM बुलढाणा जिल्हाध्यक्ष दानिश शेख यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ईद-ए-मिलादुन्नबी हा धार्मिक तसेच सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा दिवस असून, या दिवशी राज्यभरात दारू तसेच इतर मादक पदार्थांची विक्री पूर्णपणे बंद ठेवण्यात यावी, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. मद्यविक्रीमुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या आणि अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. नशामुक्त महाराष्ट्रासाठी जनजागृतीची मागणी केवळ मद्यविक्री बंद ठेवण्यापुरता निर्णय मर्यादित न ठेवता सामाजिक सौहार्द, शांतता, बंधुभाव आणि नशामुक्तीसाठी राज्यभर व्यापक जनजागृती अभियान राबवावे, अशी मागणी दानिश शेख यांनी केली. ईद-ए-मिलादुन्नबीचा दिवस शांतता, सामाजिक एकता आणि बंधुभावाचा संदेश देणारा ठरावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. निवेदन देताना अब्दुल रहमान, शेख तालिब, शेख इसाक, शेख तनवीर, शेख इमरान, शेख इरशाद, रेहानुद्दीन, अब्दुल वाजिद, दानिश शेख, शेख रेहान, शेख वसीम यांच्यासह मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते. दरम्यान, ईद-ए-मिलादुन्नबीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या या मागणीवर राज्य शासन काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सविता राजपूत यांना इंग्रजी विषयात पीएचडी पदवी!

जन सम्राट टाईम्स



**भडगाव | प्रतिनिधी:** तालुक्यातील सावदा येथील सविता कर्तारसिंग राजपूत यांनी इंग्रजी विषयात केलेल्या संशोधनाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' (पीएचडी) पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सविता राजपूत यांनी पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयातील डॉ. स्वप्ना व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी विषयातील संशोधन पूर्ण केले. सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी पीएचडीसारखी सर्वोच्च शैक्षणिक पदवी संपादन केली आहे. सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेल्या सविता यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कुटुंबाच्या जबाबदाऱ्या आणि शिक्षणाचा सुरेख समन्वय साधला. एकत्र कुटुंबातील जबाबदाऱ्या सांभाळतानाच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

सीईटी तसेच पीएचडीपर्यंतचा शैक्षणिक प्रवास त्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर पूर्ण केला. सविता राजपूत या युवा उद्योजक भगवान नामदेव राजपूत यांचे लहान बंधू कर्तारसिंग राजपूत यांच्या पत्नी आहेत. त्यांच्या या यशात कुटुंबीय तसेच संशोधन मार्गदर्शकांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. सविता राजपूत यांचे हे यश विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरले असून, परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी शिक्षणाची जिद्द आणि मेहनत असेल तर यशाचे शिखर गाठता येते, हे त्यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे. त्यांच्या यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.तालुक्यातील सावदा येथील सविता कर्तारसिंग राजपूत यांनी इंग्रजी विषयात केलेल्या संशोधनाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' (पीएचडी) पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाविरोधात जळगावात एल्गार मोर्चाची तयारी

## समविचारी संघटनांना एकत्र आणण्यासाठी पद्मालय विश्रामगृहात विचारविनिमय; आंदोलनाची दिशा व रणनीती ठरणार

जन सम्राट टाईम्स




जळगाव | प्रतिनिधी : अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात जळगावात एल्गार मोर्चा आयोजित करण्याच्या दृष्टीने जळगाव शहर व तालुक्यातील प्रमुख आंबेडकरवादी कार्यकर्ते तसेच समविचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ४ वाजता पद्मालय विश्रामगृह, जळगाव येथे ही बैठक होणार आहे. महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाचा निर्णय घेतल्याने सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना आणि संविधानिक मूल्यांना बाधा पोहोचत असल्याचा आरोप विविध सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे. या निर्णयाविरोधात व्यापक जनआंदोलन उभारण्याच्या उद्देशाने जळगाव शहर व तालुक्यातील सर्व समविचारी संघटनांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

बैठकीत अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाविरोधात एल्गार मोर्चाचे आयोजन, आंदोलनाची दिशा, संघटनात्मक नियोजन तसेच पुढील आंदोलनाची रणनीती याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. आंदोलन अधिक व्यापक करण्यासाठी विविध सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक घटकांचा सहभाग वाढविण्याबाबतही विचारविनिमय होणार आहे. अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी तसेच संविधानिक न्यायाच्या प्रश्नावर एकत्रितपणे लढा उभारण्यासाठी जळगाव शहर व तालुक्यातील आंबेडकरवादी विचारांच्या सर्व संघटना आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या बैठकीत विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आपली भूमिका मांडणार असून, त्यानंतर एल्गार मोर्चाच्या आयोजनाबाबत पुढील निर्णय घेण्यात येण्याची शक्यता आहे. "एकजूट • संघर्ष • संविधानिक न्याय" या भूमिकेतून उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात व्यापक आंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत असून, या बैठकीकडे जळगावातील आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# सावदा पोलिसांची धडक कारवाई; गहाळ झालेले 1 लाख 49 हजारांचे मोबाईल हस्तगत

## CEIR पोर्टलच्या मदतीने तांत्रिक तपास; विविध ठिकाणांहून ७ मोबाईल शोधण्यात यश

जन सम्राट टाईम्स



**सावदा | प्रतिनिधी:** सावदा पोलीस ठाणे हद्दीत विविध कारणांनी गहाळ झालेले मोबाईल शोधून काढण्यात सावदा पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे तब्बल १ लाख ४९ हजार रुपये किमतीचे सात मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. यामध्ये VIVO, REALME, REDMI, MOTOROLA तसेच APPLE कंपनीच्या IPHONE मोबाईलचा समावेश आहे. सावदा पोलीस ठाण्यात मोबाईल हरवल्याबाबत नागरिकांकडून तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी गहाळ नोंद वहीतील मोबाईलची माहिती संकलित केली. त्यानंतर केंद्र सरकारच्या CEIR (CENTRAL EQUIPMENT IDENTITY REGISTER) पोर्टलवर संबंधित मोबाईलचे IMEI क्रमांक टाकून तांत्रिक पद्धतीने तपास सुरू करण्यात आला. तांत्रिक विश्लेषणातून मोबाईल विविध ठिकाणी वापरात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी त्यांचा माग काढत भुसावळ, जळगाव जिल्ह्यासह इतर ठिकाणांहून हे मोबाईल हस्तगत केले. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलमध्ये विलास कोळी (रा. वाघोदा खु.) यांचा २० हजार रुपये किमतीचा VIVO मोबाईल, कमलाकर पाटील (रा. रोझोदा) यांचा २० हजार रुपये किमतीचा REALME मोबाईल, तर विनोद जगन्नाथ वाघ (रा. वाघोदा बु.) यांचा १२ हजार रुपये किमतीचा REDMI मोबाईलचा समावेश आहे. याशिवाय शेख फरहान शेख इरफान (रा. फैजपूर) यांचा १२ हजार रुपये किमतीचा VIVO मोबाईल आणि प्रशांत जावळे (रा. कळमोदा) यांचा १० हजार रुपये किमतीचा MOTOROLA मोबाईल पोलिसांनी शोधून काढला आहे. तसेच वाकोला पोलीस ठाणे, मुंबई येथील प्रॉपर्टी मिसिंग नोंदीतील सुमारे १५ हजार रुपये किमतीचा VIVO मोबाईलही सावदा पोलिसांनी हस्तगत केला आहे. याशिवाय APPLE कंपनीचे दोन IPHONE, सुमारे ६० हजार रुपये किमतीचे, पोलिसांच्या हाती लागले आहेत. या कारवाईमुळे मोबाईल हरविलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, तांत्रिक तपासाच्या माध्यमातून गहाळ मोबाईल शोधण्याची पोलिसांची कार्यक्षमता अधोरेखित झाली आहे. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलच्या मूळ मालकांची खातरजमा करून ते संबंधितांच्या ताब्यात देण्याची प्रक्रिया सुरू आहे. CEIR पोर्टलचा प्रभावी वापर करून मोबाईल शोधण्याची ही कारवाई सावदा पोलिसांच्या तांत्रिक तपासातील महत्त्वपूर्ण कामगिरी मानली जात आहे.सावदा पोलीस ठाणे हद्दीत विविध कारणांनी गहाळ झालेले मोबाईल शोधून काढण्यात सावदा पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे तब्बल १ लाख ४९ हजार रुपये किमतीचे सात मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. यामध्ये VIVO, REALME, REDMI, MOTOROLA तसेच APPLE कंपनीच्या IPHONE मोबाईलचा समावेश आहे. सावदा पोलीस ठाण्यात मोबाईल हरवल्याबाबत नागरिकांकडून तक्रारी दाखल करण्यात आल्या.

# 'आम्ही भारताचे लोक'च्या राज्यस्तरीय नियुक्त्या जाहीर!



जन सम्राट टाईम्स

पुणे | प्रतिनिधी :'आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ' (महाराष्ट्र राज्य)च्या राज्यस्तरीय नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. चळवळीच्या मुख्य समन्वयक संदेश शालिनी संभाजी कर्डक यांनी या नियुक्त्यांची घोषणा केली. यामध्ये डॉ. अविनाश मनवर यांची राज्य सांस्कृतिक विभाग प्रमुख, सुनंदा साबळे यांची राज्यस्तरीय स्पर्धा व उपक्रम नियोजन प्रमुख, वैशाली देठे यांची राज्य साहित्यिक व कलावंत समन्वयक प्रमुख, तर संघशिल भद्रे यांची राज्य प्रसिद्धी व जनसंपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या जबाबदाऱ्यांमुळे 'आम्ही भारताचे लोक'च्या राज्यस्तरीय कार्याला अधिक व्यापकता आणि गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. सांस्कृतिक, साहित्यिक, कलावंत, प्रसिद्धी तसेच विविध सामाजिक उपक्रमांना प्रभावी स्वरूप देण्यासाठी नवनियुक्त पदाधिकारी कार्यरत राहणार आहेत. या नियुक्त्यांचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत असून, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.